कायम विना अनुदान
इंग्रजी माध्यम

जा.क्र. माध्य/३/१२/३१/प्रथम मान्यता/पुणे
१९९७-९८
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे - ४११ ००१
यांचे कार्यालय

प्रति,
आदित्य एज्यूकेशन सोसायटी,
गणेशनगर, पुणे ४११ ०३८

**विषय : सन १९९७ – ९८ या शैक्षणिक संस्थेस कायम विनाअनुदान तत्वावर नवीन प्राथमिक शाळांना प्रथम मान्यता देणे बाबत**

संदर्भ : १) शासन निर्णय क्र नप्राशा-१७०६/२३४/९८-प्राशि-३ दि. २३/२/९८
२) या कार्यालयाचा जा.क्र. नप्राशा-१७०६/२३४/९८-पुणे ९७-९८
३) कार्यालयाचे पत्र क्र नप्राशा-१७०६/२३४/९८-प्राशि-३ दि.२३/२/९८

| अ.क्र | शैक्षणिक संस्थेचे नांव | शाळेचे नाव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १ | आदित्य एज्युकेशन सोसायटी, गणेशनगर, पुणे ३८ | चैतन्य प्रायमरी स्कूल आदित्य एज्युकेशन सोसायटी, गणेशनगर, पुणे ३८ | चार वर्ग | इंग्रजी |

वरील संदर्भीय पत्रान्वये आपल्याला कळविण्यात येते की, आदित्य एज्युकेशन सोसायटी, गणेशनगर,पुणे संस्थेच्या चैतन्य प्रायमरी स्कूल, गणेशनगर, पुणे ४११ ०३८ प्राथमिक शाळेस शैक्षणिक वर्ष १९९८ पासून कायम विना अनुदान तत्वावर विशेष बाब म्हणून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता अटींची पूर्तता अधिन राहून देण्यात येत आहे. शिक्षण अधिकारी, प्राथमिक यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहेत. किंवा कसे याची तपासणी करून पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठविताना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत.

१) संस्थेने स्वतःच्या मालकीचे शैक्षणिकदृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करून द्यावी
२) मुख्याध्यापक कधी पात्र व अनुभवी व्यक्तिची नेमणूक करावी
३) स्वतंत्र व विषयावर प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करून द्यावी
४) स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करून दरवर्षी अधीक ग्रंथांची भर घालावी
५) विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून द्यावे
६) पुरेसा प्रशिक्षीत शिक्षक वर्ग उपलब्ध करून द्यावे

७) स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करून द्यावे
८) तसेच फी चे दर मा. उपसंचालक,पुणे विभाग, पुणे ४११ ००१ यांचेकडून मंजूर करून घ्यावेत.
९) शालेय रेकॉर्ड, प्राथमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्यायावत नोंद घेण्यात यावयात.
१०) सदर संस्थेची आर्थीक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.
११) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (प्राव्हिजन ऑफ कॅपीटेशन फीज) कायदा १९८३ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी, वर्गणी विद्यार्थ्यांकडून जमा करू नये.
१२) कायम विनाअनुदान तत्वावर मिळालेली शाळा असे फलक ठळक अक्षरात शाळेच्या दर्शनी भागात पालकांना दिसेल अशातऱ्हेने लावणे. हे आपल्या संस्थेवर बंधनकारक आहे.
१३) जादा उघडण्यात आलेल्या तुकडयातून खात्याने पाठविलेले प्रवेश प्राधान्याने देण्यात यावेत तसेच प्रवेशाच्या वेळी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची देणगी स्विकारू नये.

SANDHYA NIGHOJKAR
TRUSTEE
ADITYA EDUCATION SOCIETY

१४) शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र. एसएसएन २१०३/५०/०३ मा.शि. मधील शर्ती व अटी कार्य पध्दती संस्थेवर बंधनकारक राहीतील

१५) सदर संस्थेमार्फत शाळा सुरू करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही. वरील बाबींपैकी एकजरी बाब आपल्या संस्थेच्या विरोधात असल्यास दिलेली परवानगी आपोआप रद्द झाल्याचे समजण्यात यावे

आपल्या शाळेला खात्याची प्रथम मान्यतासाठी शाळा संहिता नियमावली ३,१ नुसार शाळा सुरू झाल्यापासून १ महिन्याच्या आत विहित प्रपत्रात अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच मंडळाची प्रथम मान्यतेकरीता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय मंडळाने संस्थांना मान्यता देण्याची पध्दती मधील नियम १ ते १५ पर्यंत विहीत केलेल्या नियमाप्रमाणे व प्रपत्रात अर्ज करावा.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१ करीता

SANDHYA NIGHOJKAR
TRUSTEE
ADITYA EDUCATION SOCIETY